**नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प,**

**डॉ पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला भारत मौसम विभाग**

**ईमेल - mahapocra@gmail.com, gkmsakola@yahoo.com**

**वर्धा कृषि हवामान सल्ला** **शुक्रवार , दिनांक – २७ नोव्हेंबर २०२०**

| हवामान घटक | हवामान अंदाज ( दिनांक २८ नोव्हेंबर २०२० ते ०२ डिसेंबर २०२०) | | | | |
|---|---|---|---|---|---|
| दिनांक | २८/११ | २९/११ | ३०/११ | ०१/१२ | ०२/१२ |
| पाऊस (मिमी) | १ | ० | ० | ० | ० |
| कमाल तापमान (अं.से.) | ३१ | ३२.२ | ३१ | ३२ | ३२.१ |
| किमान तापमान (अं.से.) | १९ | १७ | १६ | १६ | १५ |
| वा-याची दिशा | ७० | ७० | ६५ | ६० | ७५ |
| सकाळची सापेक्ष आर्द्रता (%) | ५० | ४८ | ४५ | ४५ | ४० |
| दुपारची सापेक्ष आर्द्रता (%) | २ | २ | २ | २ | २ |
| वा-याचा वेग (किमी / तास) | ४५ | ४५ | ३५ | ५० | ५० |
| ढग स्थिती (आकाश) | ढगाळ | अंशतः ढगाळ | अंशतः ढगाळ | अंशतः ढगाळ | अंशतः ढगाळ |

| हवामानाचा इशारा | हवामान अंदाजानुसार दिनांक २७ नोव्हेंबर ते ०१ डिसेंबर दरम्यान हवामान कोरडे राहण्याची शक्यता आहे. | |
|---|---|---|
| पिकांचे नाव | अवस्था | कृषि हवामान सल्ला |
| कपाशी | फुल पाती / बोंड | अगोदर पेरणी केलेले कपाशी पिक वेचणीला आले आहे तरी कापूस वेचतांना प्रतवार व वाण प्रत वेचून त्याची सुकलेल्या सुरक्षित ठिकाणी साठवणूक करावे.<br>कपाशीची पाने लालसर झाल्यास १ टक्का युरिया + १ टक्का मेग्नेसिअम सल्फेटची फवारणी करावी.<br>पिकात शेंदरी बोंड अळीच्या नियमित सर्वेक्षण करून किडक्या बोंडाची आर्थिक नुकसान पातळी ५ ते १०% असल्यास थायोडीकार्ब ७५% डब्ल्यूपी २५ ग्रॅम किंवा क्विनॉलफॉस २५% एएफ २५ मि.ली किंवा क्लोरपायरीफॉस २५% प्रवाही २५ मि.ली किंवा प्रोफेनोफॉस ५०% ३० मिली किंवा इन्डोक्झाकार्ब १५.८% १० मि.ली या पैकी कोणतेही एक कीटकनाशक १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी.<br>जेथे प्रादुर्भाव १० टक्केच्या वर आहे अशा ठिकाणी पुढील कोणत्याही एका मिश्र कीटकनाशकाची, ट्रायझोफॉस ३५% + डेल्टामेथ्रीन १ टक्के १७ मि.ली किंवा क्लोरान्ट्रोनिलीप्रोल ९.३ टक्के + लेम्बडासायहॅलोथ्रीन ४.६ टक्के ५ मि.ली किंवा क्लोरपायरीफॉस ५० टक्के + सायपरमेथ्रीन ५ टक्के २० मि.ली किंवा इन्डोक्झाकार्ब १४.५ टक्के + ॲसिटामाप्रिड ७.७ टक्के १० मि.ली या पैकी कोणतेही एक मिश्र कीटकनाशक १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. |

| | | |
|---|---|---|
| | | कपाशी पिकात ८-१० बोंड व नवीन फुल पाते दिसत असल्यास त्यावर कीटकनाशक ची फवारणी करावी जर ६० टक्के बोंड किडके असतील तर पिकास खर्च न करता कपाशी उपटून रब्बी साठी शेत तयार करावे.<br>कापूस संकलन केंद्र व साठवणूक ठिकाणी प्रौढ अवस्थेतील शेंदरी बोंडअळीची नियमित वेचणी करावी ज्यामुळे पुढील वर्षी त्याचा प्रादुर्भाव कमी होईल. |
| तूर | वाढ | हवामान अंदाजानुसार पुढील आठवड्यात हवामान अंशतः ढगाळ राहणार असेल्यामुळे हवामान तूर पिकावरील शंगा पोखरणाऱ्या अळीच्या वाढीसाठी पोषक आहे व त्यामुळे तूर पिकाला शेंगा पोखरणाऱ्या आळ्यापासून नुकसान होण्याची शक्यता आहे. तरी शेतकरी बंधूनी आपल्या पिकाची पाहणी करावी व अळी ३ प्रती झाड किंवा पिसारी पतंगाची अळी १ ते ३ प्रती झाड किंवा ५ ते १० टक्के शेंगाचे नुकसान आढळल्यास वेवस्थापनसाठी प्रती हेक्टर २० पक्षीथांबे शेतात उभारावेत, त्यामुळे पक्षी किडीच्या अळ्या खावून फस्त करतात. तसेच नियंत्रणासाठी पहिली फवारणी ५ टक्के निंबोळी अर्क किंवा ३०० पीपीएम अझाडीरेक्टीन प्रती ५० मि.ली किंवा १५०० पीपीएम अझाडीरेक्टीन प्रती २५ मि.ली किंवा एच.ए.एन.पि.व्हि( १x१०$^{९}$ पिओबी/ मिली) ५०० एल.ई/ हे. किंवा बॉसिलस थुरिनजिएसिस १५ मि.ली किंवा क्विनॉलफॉस २५ टक्के ई.सी २० मि.ली किंवा थायोडीकार्ब ७५ टक्के डब्ल्यूपी २० ग्रॅम १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी.<br>दुसरी फवारणी (पहिल्या फवारणीनंतर १५ दिवसांनी क्लोरान्ट्रोनिलीप्रोल १८.५ टक्के एस.सी. प्रवाही ३ मि.ली किंवा इन्डोक्झाकार्ब १५.८ टक्के ईसी ६.६ मि.ली किंवा लेम्बडासायहॅलोथ्रीन ५ टक्के प्रवाही १० मि.ली किंवा फ्ल्युबेंडामाईड २० टक्के डब्ल्यूपी ५ ग्रॅम किंवा इमामेक्टीन बेन्झोएट ५ टक्के एसजी ४.४ ग्रॅम किंवा क्लोरान्ट्रोनिलीप्रोल ९.३ टक्के + लेम्बडासायहॅलोथ्रीन ४.६ टक्के झेडसी ४ मि.ली प्रती १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी.<br>तूर पिकात ओलिताची सोय असल्यास व गरज पडल्यास पिकास पाणी द्यावे. |
| हरभरा | वाढ | हरभरा पिकास आंतरमशागत जसे निंदण करून पिक तण विरीहीत ठेवावे.<br>ओलिताची सोय असल्यास पिकास पाणी द्यावे. |
| गहू | पेरणी | ओलिताखालील उशिरा गहुची पेरणी १५ नोव्हेंबर ते १५ डिसेंबर पेरणीसाठी, वाण पीडीकेवी सरदार (एकेएडब्लू ४२१०-६), एकेडब्लू-१०७१(पूर्णा) ची पेरणी करावी. बियाण्यास कार्बेन्डाझीम प्रती २.५ ग्रम प्रती किलो ची बीज प्रक्रिया पेरणी अगोदर करावी. या वेळी ४० किलो नत्र + ४० किलो स्फुरद + ४० किलो पालाश या प्रमाणे पेरणीच्या वेळेस स्फुरद व पालाशची संपूर्ण मात्रा आणि नत्राची अर्धी मात्रा तसेच १८ ते २० दिवसांनी नत्राची दुसरी मात्रा पहिल्या पाणी देतांना द्यावी. |
| रब्बी ज्वारी / मका | पेरणी | पिकात गरज पडल्यास निंदण व डवरणी करून पिक तण विरहित ठेवावे.<br>ओलिताची सोय असल्यास पिकास पाणी द्यावे, त्यासोबत उर्वरित रासायनिक खताचा नत्राची मात्रा प्रती ४० किलो प्रती हेक्टरी द्यावे. |
| करडी | वाढ | रब्बी पिकामध्ये करडी पिकात गरज पडल्यास निंदण व डवरणी करून पिक तण विरहित ठेवावे.<br>करडई पिकाचे धुऱ्याजवळील झाडावर मावा किडीचा प्रादुर्भाव दिसताच फक्त सभोवतालच्या ४ ओळीवर डायमीथोएट ३० टक्के प्रवाही १३ मि.ली १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. ज्या ठिकाणी पिक ३० दिवसाचे झाले आहे तिथे ओलिताची सोय असल्यास पिकास पाणी द्यावे. |

| | | |
|---|---|---|
| | | करडई पिकाच्या अधिक उत्पन्नसाठी पिकास सौरक्षित ओलीत देण्याची शिफारस आहे, एक ओलिताची सोय असल्यास पेरणीपासून ५० दिवसांनी, दोन ओलिताची सोय असल्यास पेरणीपासून ३० व ५० दिवसांनी तसेच तीन ओलिताची सोय असल्यास पेरणीपासून ३०, ५० व ६५ दिवसांनी ओलीत द्यावे. |
| हरभरा | पेरणी | हरभरा पिकास आंतरमशागत जसे निंदण करून पिक तण विरीहीत ठेवावे .<br>ओलिताची सोय असल्यास पिकास पाणी द्यावे. |
| भाजीपाला | वाढ | भाजीपाला पिकास त्याच्या गरजे प्रमाणे पाणी द्यावे.<br>गादीवाफ्यावर कांदा बियाणे (हेक्टरी ८ ते १० किलो ) पेरावे. पांढऱ्या जाती : अकोला सफेद, फुले सफेद, यशोदा, भीमा श्वेता, पुसा व्हाईट राउंड, लाल-पुसा रेड, एन २-४-१, निफाड- ५३, बसवंत ७८०.<br>कोथिंबीर (संभार , लसून, मुला, मेथी, पालक, श्रावण घेवडा, बटाटा, गाजर, गवार, वाटणा इ.भाजीपाला पिकांची लागवड करावी. |
| फळझाडे | वाढ | संत्राच्या आंबिया बहराच्या पक्क झालेले फळांची योग्य पद्धतीने तोडून प्रतवारी करून विक्री करावी. फळाबागेतील आळे तण विरीहीत ठेवावे.<br>पेरू व सीताफळ बागेतील फळतोडणी वेळेवर करावी.<br>निंबू फळाबागेतील हस्त बहाराच्या खत वेवस्थापणासाठी झिंक सल्फेट, फेर्रोस सल्फेट व मेग्नेसिअम सल्फेटची फवारणी करावी प्रती ५० ग्रम अधिक चुना ४० ग्रम प्रती १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी.<br>जुन महिन्यात लावलेल्या पपई फळबागेला खत वेवस्थापणासाठी १९:१९:१९ नत्र स्फुरद पालाश प्रती २५० ग्रम प्रती झाड या प्रमाणे द्यावे. |
| पशु / जनावरे | | पायखुरी व तोंडखुरी रोगाच्या संरक्षणासाठी पशुधन व दुग्ध जनावरांचे लसीकरण करावे. |

सदर कृषि सल्ला पत्रिका डॉ पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला येथील ग्रामीण कृषि मौसम सेवा योजनेतील तज्ञ समितीच्या शिफारशीवरून तयार करून प्रसारित करण्यात आली असून नानाजी देखमुख कृषी संजीवनी प्रकल्प कार्यालय मुंबई येथून प्रसारित करण्यात आलेली आहे.